Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# शाळासिद्धी कार्यक्रमाचा शालेय गुणवत्ता विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**श्री. महेंद्र साहेबराव पाटील**, संशोधक विद्यार्थी, एम.ए.एम.एड्.,सेट,नेट, (शिक्षणशास्त्र, मराठी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र, विद्यापीठ,जळगाव

**प्राचार्य. डॉ. संजय शालकराव शिंदे**, संशोधन मार्गदर्शक, जिजामाता शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नंदुरबार

**सारांश :**

प्रस्तुत संशोधनात सर्व बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी परिणामकारक शाळा व सुधारणात्मक शालेय कामगिरी यांची वाढती गरज लक्षात घेता शालेय स्तरावरची शिक्षणाची मानके,बलस्थाने सुधारण्यासाठी शाळासिद्धी हा राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रम भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या वतीने राबविण्यात येत आहे.सर्वंकष शालेय गुणवत्तेच्या दृष्टिकोनातून शाळासिद्धी कार्यक्रमात शिक्षण व शाळा विकासाची क्षेत्रे,गाभा-मानके देण्यात आलेली आहेत, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा विकासाची क्षेत्रे व त्यातील गाभा मानके यांचा सर्वेक्षणात्मक अभ्यास करण्यात आला,प्रस्तुत संशोधनामुळे जळगाव जिल्ह्यामधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शाळासिद्धी कार्यक्रमाची सर्वंकष शालेय गुणवत्तेची सद्यस्थिती व शाळासिद्धी कार्यक्रमाचा शालेय गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम दिसून आला.

**प्रस्तावना (Introduction in Short) :**

मुलांचे शिक्षण आणि त्यांचा व्यक्तिमत्व विकास म्हणजे राष्ट्राच्या भावी विकासाची पायाभरणी,म्हणून समाजातील शाळेत येणारं प्रत्येक मूल शाळेत चांगल्या पद्धतीने शिकावं,हा शिक्षण प्रक्रियेचा महत्वपूर्ण उद्देश आहे.शरीर,मन व आत्मा यांचा उत्कृष्ट विकास म्हणजे शिक्षण.(महात्मा गांधी) शिक्षण म्हणजे समस्या सोडवण्याची क्षमता.(जॉन ड्युई)विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी शालेय वातावरण पोषक असणे गरजेचे आहे.वर्गात व वर्गाबाहेरचे शालेय वातावरण,आजूबाजूचा परिसर प्रसन्न आणि आनंददायी असला पाहिजे.भौतिक सुविधांसोबत शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील आंतरक्रिया आनंददायी व प्रभावी असणे आवश्यक आहे.अध्ययन अध्यापनात नव-नवीन कल्पना तंत्र आणि तंत्रज्ञानाची जोड असणे गरजेचे आहे.या अनुषंगाने प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम,शाळासिद्धी कार्यक्रम शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहेत.

**संशोधनाची पार्श्वभुमी (Research Background) :**

'देशाचे भवितव्य शाळेच्या वर्गा-वर्गातून आकार घेत आहे',असे भारतीय शिक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ.दौलतसिंह कोठारी यांनी म्हटले आहे.या अनुषंगानेच शाळा हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे एक अत्यंत महत्वपूर्ण साधन आहे,तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास घडवून आणणे हे शालेय शिक्षणाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे.कोठारी आयोगाने शाळांना पुस्तके व शैक्षणिक साहित्य,शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण योजना राबविण्याची शिफारस केली.राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-१९८६ नुसार माध्यमिक शिक्षणात संगणक कौशल्य विकसन,शैक्षणिक व इतर साहित्य पुरविणे.इत्यादी शिफारशी केल्या.एनसीएफ-२००५च्या मसुद्यात विद्यार्थ्यांनी शिकावे कसे हे शिकणे,विशेष गरजा असणाऱ्या मुलांचे शिक्षण,सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन इत्यादी महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

या सर्व आयोग व शैक्षणिक धोरणांच्या दिशा निर्देशानुसार देशातील शिक्षण प्रक्रियेची वाटचाल सुरू आहे व याच अनुषंगाने देशात शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ अंमलात आला आहे. त्यानुसार शिक्षणाचा मूलभूत अधिकारात समावेश करण्यात आला आहे.शिक्षण प्रक्रिया परिणामकारक होण्यासाठी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत शाळांना शैक्षणिक,भौतिक सोयीसुविधा व इतर शैक्षणिक उपक्रमांसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक निधी उपलब्ध करून दिला जातो.शालेय गुणवत्ता विकास साधणे,हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.यानुसार मानव संसाधन विकास मंत्रालय भारत सरकार यांनी शाळा मानके आणि मूल्यांकनाचा राष्ट्रीय कार्यक्रम ‘शाळासिद्धी’ या बालकांच्या गुणात्मक शिक्षणासाठी आणि शाळांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठीच्या राष्ट्रीय कार्यक्रमास एक अत्यावश्यक बाब म्हणून देशभरात राबविण्यास मान्यता दिली.तसेच महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारच्या या निर्णयाला प्रतिसाद देत जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये शाळासिद्धी कार्यक्रम राबविण्यात येतो.

सॉक्रेटिस म्हणत असे,जितक्या शाळा चांगल्या तितके राष्ट्र चांगले,जितक्या शाळा चांगल्या तितके शिक्षक चांगले.त्यामुळे शाळा समृद्ध व्हाव्यात व शिक्षक अधिक क्रियाशील व कौशल्य संपन्न व्हावेत. कोणत्याही देशाच्या शिक्षणाची गुणवत्ता ही शिक्षकांच्या गुणवत्तेवर ठरत असते.

‘शालेय स्तरावर शिक्षणाची मानके सुधारण्याची नितांत आवश्यकता लक्षात घेता आम्ही असे सुचवितो की शालेय सुधारणेचा एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम विकसित केला जावा,ज्यामध्ये प्रत्येक शाळेला आपल्या क्षमतेने सर्वोत्कृष्ट परिणाम मिळविण्याचे प्रयत्न सातत्याने करण्यास पोषक वातावरण निर्मिती होईल’,या कोठारी आयोग-१९६४.च्या शिफारशी तसेच वेळोवेळी जाहीर झालेली शैक्षणिक धोरणे आणि शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ नुसार शाळांना शालेय सुधारणा केंद्रित सर्वंकष व सर्वांगीण शालेय मूल्यांकन यंत्रणा विकसित करण्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे.शालेय मूल्यांकनाचे शाश्वत व समाज व्यवस्थेचा भाग बनवणारी व्यवस्था निर्माण करून देशातील सर्व शाळांपर्यंत पोहोचण्याचे ध्येय या शाळासिद्धी कार्यक्रमाचे आहे.विविध राज्यांमधील शाळा मूल्यांकन उपक्रमांची बलस्थानं तसेच शाळा मूल्यांकनाच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधनावर आधारित अभ्यास करून शाळासिद्धी ह्या राष्ट्रीय शैक्षणिक कार्यक्रमाची रचना करण्यात आली आहे.शालेय मूल्यांकन हे साधन आणि शालेय स्व-सुधारणा हे लक्ष,हे या शाळा सिद्धी कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे.बालकांच्या आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक निधी दिला जातो याद्वारे शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधा निर्माण करून त्याचा वापर योग्य शैक्षणिक वातावरण निर्मितीसाठी कितपत  होत आहे?,तसेच शाळासिद्धी कार्यक्रमातील शाळा विकासाची क्षेत्रे,गाभा मानके व शालेय गुणवत्तेची सद्यस्थिती आणि शाळेकडे उपलब्ध असलेले सामर्थ्य स्त्रोत व शालेय गुणवत्ता विकासाची सद्य स्थिती जाणून घेण्यासाठी अभ्यासाची गरज आहे,यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेण्यात आले.

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

१. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील सामर्थ्य स्त्रोतांची उपलब्धता,पर्याप्तता, उपयोगितेचा अभ्यास करणे.

२. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील अध्यापन-अध्ययन व मूल्यमापन प्रक्रियेचा अभ्यास करणे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

३. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील अध्ययनार्थी प्रगती,संपादणूक व विकासाच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

४. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शिक्षक कामगिरी व व्यावसायिक विकास विकासाचे व्यवस्थापन याचा अभ्यास करणे.

५. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शालेय नेतृत्व व व्यवस्थापन स्थितीचा अभ्यास करणे.

६. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील समावेशन,आरोग्य व सुरक्षा स्थितीचा अभ्यास करणे.

७. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील उत्पादक समाज सहभागाचा अभ्यास करणे.

८. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शाळासिद्धी कार्यक्रमात सर्वंकष शालेय गुणवत्ता प्राप्तीत येणाऱ्या समस्या जाणून घेणे.

प्रस्तुत संशोधनासाठी परिकल्पना पुढीलप्रमाणे आहेत.

**शून्य परिकल्पना**

१. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शाळासिद्धी कार्यक्रमाची शाळा विकासाची क्षेत्रे,गाभा-मानके आणि शालेय गुणवत्ता विकासावर परिणाम करणाऱ्या घटकांचा कमी अधिक प्रमाणात फरक आढळतो.

२. जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शाळासिद्धी कार्यक्रमाच्या शाळा विकासाची क्षेत्रे,गाभा-मानके तसेच शालेय शालेय गुणवत्ता विकासावर परिणाम करणारे घटक यांच्यात प्रामाणिकपणे स्व-सुधारणा केल्या तर शालेय गुणवत्ता विकासाची परिणामकारकता निश्चितच वाढते.

**दृष्टीकोन व कार्यपद्धती (Approach/Methodology) :**

शाळांना शालेय सुधारणा केंद्रित सर्वंकष व सर्वांगीण शालेय मूल्यांकन यंत्रणा विकसित करण्यावर अधिक भर देण्यात आलेला आहे.शालेय मूल्यांकनाचे शाश्वत व समाज व्यवस्थेचा भाग बनवणारी व्यवस्था निर्माण करून देशातील सर्व शाळांपर्यंत पोहोचण्याचे ध्येय या शाळासिद्धी कार्यक्रमाचे आहे.

शालेय मूल्यांकन हे साधन आणि शालेय स्व-सुधारणा हे लक्ष,हे या शाळासिद्धी कार्यक्रमाचे वैशिष्ट्य आहे.बालकांच्या आणि शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक निधी दिला जातो याद्वारे शैक्षणिक व भौतिक सोयी सुविधा निर्माण करून त्याचा वापर योग्य शैक्षणिक वातावरण निर्मितीसाठी कितपत  होत आहे ?,तसेच शाळासिद्धी कार्यक्रमातील शाळा विकासाची क्षेत्रे,गाभा मानके व शालेय गुणवत्ता विकासाची सद्यस्थिती समजली आणि शाळेकडे उपलब्ध असलेले सामर्थ्य स्त्रोत व त्यांचा शालेय गुणवत्ता विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास प्रस्तुत संशोधनाद्वारे करण्यात आला. म्हणून शालेय गुणवत्ता विकासावर होणाऱ्या परिणामांच्या अभ्यासाची गरज आहे,यासाठी प्रस्तुत संशोधन कार्य हाती घेण्यात आले.

**संशोधनाची पद्धती :- वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पद्धती**

वर्णनात्मक सर्वेक्षण पद्धतीतील वैशिष्ट्यानुसार विशिष्ट काळातील तसेच वर्तमान काळातील सद्यस्थितीची माहिती फार मोठ्या प्रमाणात संकलित करता येते व संकलित माहितीचे मापन,वर्गीकरण,अर्थनिर्वचन आणि मूल्यांकन या आधारे वर्णन केलेल्या विषयाचे स्पष्टीकरण करता


Copyright © | JET Network, All Rights Reserved

येते.संशोधकास जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शाळासिद्धी कार्यक्रमाचा शालेय गुणवत्ता विकासावर होणारा परिणामांचा वर्तमान व गतकाळातील अभ्यास करावयाचा असल्याने त्याकरिता वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पद्धती योग्य आहे,म्हणून संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पद्धती निवड करण्यात आलेली आहे.

**अभिकल्प :**

निवडलेल्या नमुना शाळांमधील मुख्याध्यापकांकडून सर्वेक्षण प्रश्नावली भरून घेण्यात आली.त्यातून मिळालेल्या माहितीचे संकलन,संख्याशास्त्रीय विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात आले आहेत.

**जनसंख्या व न्यादर्श :**

**जनसंख्या :-** जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषद संचलित १५ तालुक्यांमधील १८२८ प्राथमिक शाळा व त्यातील मुख्याध्यापक यांचा समावेश संशोधन जनसंख्येत करण्यात आला.

**न्यादर्श :-** प्रस्तुत संशोधनासाठी जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या पंधरा तालुक्यातील एकूण १८२८ प्राथमिक शाळा(जनसंख्या) पैकी १५ तालुक्यातून प्रत्येकी ७ म्हणजे एकूण १०५ प्राथमिक शाळा नमुना म्हणून सुगम यादृच्छिक नमुना लॉटरी पद्धतीने निवड करण्यात आल्या आहेत.

**संशोधनाची साधने :**

प्रस्तुत संशोधनामध्ये स्वयंनिर्मित संरचीत प्रश्नावली या साधन तंत्राचा उपयोग करण्यात आला आहे.

**संख्याशास्त्रीय परिमाणे :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाईल व संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारी,शततमक, या वर्णनात्मक सांख्यिकी साधन तंत्राचा उपयोग करण्यात येईल.तसेच स्तंभ आलेखाचा उपयोग करण्यात आला आहे.शून्य परिकल्पना तसेच वर्णनात्मक सर्वेक्षण संशोधन पद्धती मध्ये या निवडलेल्या सांख्यिकी व तंत्राच्या सहाय्याने विश्वसनीय व परिणामकारक निष्कर्ष मिळतात.म्हणून संशोधकाने वरील सांख्यिकी तंत्राची निवड केली आहे.

**संशोधनाची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीमध्ये संपूर्ण जळगाव जिल्ह्याची आवश्यकता असली तरी एवढ्या मोठ्या क्षेत्रात संशोधन करणे वेळेच्या अभावी शक्य नसल्याने प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आली.

१. **भौगोलिक व्याप्ती :-** प्रस्तुत शाळासिद्धी कार्यक्रमाचा शालेय गुणवत्ता विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यासासाठी जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचा विचार केला आहे.
२. **क्षेत्र व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधनासाठी जळगाव जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा समावेश करण्यात आला आहे.
३. **आशय व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधनात शाळासिद्धी कार्यक्रमाचा शालेय गुणवत्ता विकासावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला आहे.
४. **नमुना व्याप्ती :-** प्रस्तुत संशोधनासाठी जळगाव जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील प्रत्येकी ७ याप्रमाणे एकूण १०५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा समावेश करण्यात आला आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

५. **निष्कर्ष व्याप्ती :-** संशोधनातून आलेले निष्कर्ष जळगाव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांसाठी शालेय गुणवत्ता विकासासाठी उपयुक्त ठरतील.

**मर्यादा :**

संशोधन करीत असतांना त्याची मर्यादा निश्चित करावी लागते त्यामुळे संशोधन कार्याला निश्चित दिशा मिळते.तसेच वेळेचीही बचत होते.यासाठी संशोधनाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे निश्चित केल्या.

**भौगोलिक मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनासाठी जळगाव जिल्ह्यातील १५ तालुक्यांमधील प्रत्येकी ७ याप्रमाणे एकूण १०५ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा विचार करण्यात आला आहे.

**अपेक्षित परिणाम (Expected Outcome) :**

१. सदर संशोधनाचा अभ्यास केल्यानंतर शाळासिद्धी कार्यक्रमाचा शालेय गुणवत्ता विकासावर होणारा परिणाम लक्षात आला.
२. शाळासिद्धी हा केंद्र शासनाचा देशव्यापी,महत्त्वाकांक्षी शैक्षणिक कार्यक्रम आहे.या कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळांमध्ये उपलब्ध असलेल्या सामर्थ्य स्रोत,शैक्षणिक व भौतिक सोयीसुविधा यांचे मूल्यांकन करण्यात येते व याच दृष्टीने संशोधकास शालेय गुणवत्ता विकासावर परिणाम करणारे घटक,शालेय सामर्थ्य स्रोत,शाळा विकास क्षेत्रे व गाभा-मानके यांची माहिती शालेय गुणवत्ता विकासास चालना देण्यासाठी होणार आहे.
३. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील सामर्थ्य स्रोतांची उपलब्धता,पर्याप्तता,उपयोगिता,अध्यापन-अध्ययन व मूल्यमापन प्रक्रिया,अध्ययनार्थी प्रगती,संपादणूक व विकास, शिक्षक कामगिरी व व्यावसायिक विकास विकासाचे व्यवस्थापन,शालेय नेतृत्व व व्यवस्थापन,समावेशन,आरोग्य व सुरक्षा,उत्पादक समाज सहभाग या शाळाविकासाच्या क्षेत्रांमध्ये स्व-सुधारणा करण्याची संधी उपलब्ध करून शालेय गुणवत्ता विकास साधण्यासाठी सदरचे संशोधन उपयुक्त ठरेल.

**उद्दिष्टनिहाय निष्कर्ष आणि चर्चा (Result and Discussion) :**

शाळासिद्धी कार्यक्रमातील-

१. शालेय परिसर, क्रीडा उपकरणे व साहित्यासह मैदान, वर्गखोल्या व इतर खोल्या, वीज व विद्युत उपकरणे, ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक,उतरता रस्ता, माध्यान्ह भोजन, स्वयंपाक खोली व भांडी, पेयजल, हात धुण्याची सुविधा, स्वच्छतागृह या मानकांमध्ये सुधारणा होऊन त्यांची गुणवत्ता वाढ झालेली दिसून येते.
२. शिक्षकांना अध्ययनार्थीची जाण, शिक्षकांचे विषय व अध्यापनशास्त्रीय ज्ञान, अध्यापनाचे नियोजन, अध्ययनपूरक वातावरण निर्मिती, अध्ययन-अध्यापन प्रक्रिया, वर्ग व्यवस्थापन, अध्ययनार्थीचे मूल्यमापन, अध्ययन-अध्यापन साहित्याचा वापर, शिक्षकांचे स्वत:च्या अध्यापन-अध्ययन कृतींवरील चिंतन या बाबींमध्ये सुधारणा होऊन त्यांची दर्जा वाढ झालेली दिसून येते.
३. अध्ययनार्थींची उपस्थिती,अध्ययनार्थींचा सहभाग व व्यग्रता,अध्ययनार्थींची प्रगती, अध्ययनार्थींचा वैयक्तिक व सामाजिक विकास,अध्ययनार्थींची संपादणूक या क्षेत्रांमध्ये लक्षणीय प्रगती झाल्याचे दिसून येते.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

४. नवीन शिक्षकांचे उद्बोधन, शिक्षकांची उपस्थिती, जबाबदारी निश्चिती व कामगिरी लक्ष्यांची निश्चिती, अभ्यासक्रम अपेक्षांप्रती शिक्षकांची तयारी, शिक्षक कामगिरीचे पर्यवेक्षण, शिक्षकांचा व्यावसायिक विकास या बाबींमध्ये चांगल्या प्रकारे दर्जा वाढ झालेली दिसून येते.
५. दूरदृष्टीचे विकसन व दिशा निश्चिती, बदल व सुधारणेचे नेतृत्व,अध्ययन-अध्यापनाचे नेतृत्व, शालेय व्यवस्थापनाचे नेतृत्व या चार गाभा मानकांमध्ये उत्तम प्रकारे प्रगती दिसून येते.
६. समावेशन संस्कृती, विशेष गरजा असणाऱ्या विद्यार्थ्यांचे समावेशन,शारीरिक सुरक्षितता, मानसिक सुरक्षितता, आरोग्य व स्वच्छता या बाबींमध्ये चांगल्या प्रकारे दर्जा वाढ झालेली दिसून येते.
७. शाळा व्यवस्थापन अथवा शाळा विकास व्यवस्थापन समितीचे संघटन व व्यवस्थापन, शाळा सुधारणेत भूमिका,शाळा-समाज अनुबंध,अध्ययन स्त्रोत म्हणून समाज,समाज सक्षमीकरण या घटकांमध्ये उत्तम प्रकारे व्यवस्थापन झालेले दिसून येते.

एकंदरीत जि.प. शाळांमध्ये शालेय गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षणक्षेत्रातील प्रत्येक घटक झटत आहे. डिजीटल, ज्ञानरचनावाद, शैक्षणिक साहित्य निर्मिती, नवोपक्रम, प्रशिक्षण, प्रदर्शन, सादरीकरण, नाविन्यपूर्ण उपक्रम, अध्ययन-अध्यापन, कृतीशील अध्ययन पध्दती यासह शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये अमुलाग्र सुधारणा घडवून शासन अनुदान,मुख्याध्यापक,शिक्षक यांची मेहनत तसेच लोकसहभाग आणि विविध माध्यमांतून जि.प. शाळांमध्ये शाळासिद्धी कार्यक्रमामुळे शालेय गुणवत्तेत वाढ झालेली दिसून आली.

**संदर्भ सूची (References) :**


- **मराठी**

१. कर्डिले व्ही.,आणि महाले एस., (२०१०), सामग्री विश्लेषण अन्वयार्थ संशोधन आराखडा आणि अहवाल लेखन,यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
२. कुंडले म. बा., (१९८६), शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र, श्री.विद्या प्रकाशन, पुणे३०
३. जगताप मनीषा, (२०१८), एम.ए., (शिक्षणशास्त्र) मार्गदर्शिका, कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
४. जरग ना., (२०१२), माझी समृद्ध शाळा, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद, पुणे३०
५. भिंताडे वि. रा., (१९८९), शैक्षणिक संशोधन पद्धती, नूतन प्रकाशन, पुणे३०
६. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा., (२००५), राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद, दिल्ली
७. सिल्विया ऍश्टन-वॉर्नर, (२०१८), टीचर (अरुण ठाकूर) मनोविकास प्रकाशन, पुणे३०

- **English**

1. Buch M.B., (1974), A Survey Of Research In Education, N.C.E.R.T. New Delhi16
2. Educational Development In Maharashtra State (1968), Government Of Maharashtra
3. Educational Wastage At The Primary Level (1971), N.C.E.R.T. New Delhi16
4. Mukharji S. N., History of Education In India
5. Report of Kothari Education Commission (1966)



Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 2, April-June – 2025 Special Issue 1

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

6. Report of National Education Policy (1986)
7. Shevatekar Sharada., (2020), Teacher Empowerment & Educational Excellence, Vision-2020, Atharv Publication, Jalgaon


Copyright © | JET Network, All Rights Reserved